MHSN090005372008

# निशाणी क्र. ३२१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी म्हणून दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने सदरचा दावा अतिक्रमित जमीनीचा कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१२ राजाराम कृष्णा कदम हे दिनांक १०.०६.२०२६ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.१२ यांना अर्जात नमूद प्रतिवादी क्र.१२/१ ते १२/४ हे वारस आहेत. त्यांना दाव्याचे कामी सामील करणे जरुरीचे आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे वकीलांनी म्हणणे दाखल करून अर्ज मुदतीत नसल्याचे कथन केले आहे. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा हा अतिक्रमित जमीनीचा कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१२ राजाराम कृष्णा कदम हे दिनांक १०.०६.२०२६ रोजी मयत झालेले आहेत. त्याबाबतचा मृत्यूदाखला अर्जदारांनी अभिलेखावर निशाणी क्र.३२५ अन्वये दाखल केलेला आहे. मयत प्रतिवादीचे वारस

अभिलेखावर घेतल्यास इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्यामध्ये गुणदोषावर योग्य तो न्यायनिर्णय पारित होण्यास मदत होणार आहे. मयत प्रतिवादी क्र.१२ यांच्या वारसांचे हितसंबंध दावा मिळकतीमध्ये असल्याने त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये वारस म्हणून अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल केलेला आहे. यास्तव मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' देऊन मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

**०१.** प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादीने प्रतिवादी क्र.१२ चे अर्जात नमूद असलेले वारस अभिलेखावर घेऊन त्याप्रमाणे दुरूस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर दाखल करावी.

**०३.** खर्चाबाबत आदेश नाही.

SATISH YASHWANT WAKCHAURE

Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.07.29 16:09:09 +0530

**तासगांव.**

(एस.वाय.वाकचौरे)

दिनांक : २९.०७.२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

**तासगांव.**